Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-4 | Issue-12| Jan-2015
Available online at www.isrj.org

# ॲड. रावसाहेब शिंदे यांचे 'प्रश्न आहे मूल्यांचा'- एक चिंतन

**शरद भाऊसाहेब दुधाट,**

**रा.ब.नारायणराव बोरावके** महाविद्यालय, श्रीरामपूर,जि. अहमदनगर,

**प्रास्ताविक :**

ॲड. रावसाहेब शिंदे यांचे एक वैचारिक व्यक्तिमत्त्व म्हणून मराठी साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. त्यांचे 'ध्यासपर्व' हे आत्मकथन सोडल्यास त्यांनी वैचारिक लेखनच केलेले आहे. त्यांचे 'चरित्र आणि चारित्र्य', 'भावलेली माणसे' ही व्यक्तिचित्रणात पुस्तके आहेत. 'शिक्षण आणि समाज', 'विचारवेध' ही वैचारिक पुस्तके आहेत. तर 'संवादपर्व-खंड-५'हे पत्रात्मक पुस्तक असून 'भावलेल्या प्रस्तावना' हे पुस्तक देखील त्यांच्या ग्रंथ विचारावर आधारित आहे. ॲड. रावसाहेब शिंदे यांची वैचारिक भूमिका ही जनकल्याणाच्या मुळाशी बांधलेली आहे. त्यांच्या 'प्रश्न आहे मूल्यांचा' या वैचारिक लेखसंग्रहाचा विचार करताना महाराष्ट्रातील वैचारिक वाङ्.मयाचे स्वरूप व पार्श्वभूमी लक्षात घेतली पाहिजे.

**ॲड. रावसाहेब शिंदे यांची वैचारिक भूमिका**

ॲड. रावसाहेब शिंदे यांचे जीवन मूल्यविचार आणि मूल्यसंस्कारांनी भरलेले आणि भारावलेले जीवन आहे. त्यांच्या जीवनाच्या प्रत्येक पर्वात मूल्यविचार आहे. बालपणापासूनच संवेदनशीलता, राष्ट्रभक्ती, श्रमप्रतिष्ठा या मूल्यांचा असर रावसाहेबांच्या विचारांमध्ये सामावलेला आहे. 'प्रश्न आहे मूल्यांचा' हा ॲड. रावसाहेब शिंदे यांचा वैचारिक लेखसंग्रह आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, वैज्ञानिक, विधी, राष्ट्रीय भक्ती व एकात्मता यांच्याशी संबंधीत विविध लेख रावसाहेब शिंदे यांनी या पुस्तकामध्ये समाविष्ट केलेले आहे. याशिवाय हे पुस्तक म्हणजे रावसाहेबांच्या विचारविश्वातील मूल्यविचारांची खाणच आहे. 'स्पंदने समाजजीवनाची' या भागामध्ये श्रमसंस्कृती, संवेदनशीलता, सेवाभाव, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रनिष्ठा आदी मूल्यांचे दर्शन रावसाहेब शिंदे यातून घडवितात. 'आमचे शिक्षण, दिशा की दशा' या भागातून त्यांनी राष्ट्रीय प्रेम, श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चारित्र्यशीलता या मूल्यांचा विचार केलेला आहे. 'धरतीमातेचे वस्त्रहरण' या भागातून पर्यावरण वाचविणे, श्रमप्रतिष्ठा, आचार-विचार, राष्ट्रीय संपत्तीचे संवर्धन या मूल्यांचा विचार केला जातो. 'पिता-पूर्णब्रह्माचा' या भागातून श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, राष्ट्रीय संपत्तीचे संवर्धन, सौजन्यशीलता, कर्तव्यदक्षता, वैज्ञानिक दृष्टिकोन आदी मूल्यांचे दर्शन घडते. 'कथा आणि व्यथा, स्त्रीजन्माच्या' या भागातून स्त्री-पुरूष समानता, संवेदनशीलता आणि राष्ट्रभक्ती या मूल्यांचा विचार रावसाहेबांनी केलेला आहे. तर 'स्वातंत्र्य चळवळीतले वेचे' या भागातून राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांचा विचार केलेला आहे. 'प्रेरणा आणि कर्तृत्व' या भागामध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रसेवा या मूल्यांचा विचार केलेला आहे. तर 'तेजोकण विदेशातले' या भागामध्ये राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, समता,

कष्टप्रियता, शिस्तप्रियता, कर्तव्यदक्षता, स्वच्छता, सौंदर्यदृष्टी, स्वावलंबन तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांचा विचार रावसाहेबांनी यातून केलेला आहे. याशिवाय ग्रामीण संस्कृतीचा विकास, आदिवासींची जिद्द, समुद्राशी टक्कर देण्याचे सामर्थ्य, स्त्री भ्रूणहत्या, वाचन संस्कृतीचा विकास, सरकारच्या विविध योजना, एसईझेड योजना, सरकारची शिक्षणविषयक उदासिनता या गोष्टींचाही रावसाहेबांनी आपल्या लेखातून विचार मांडलेला दिसतो. हे सर्व लेख मूल्य संस्काराचे उत्तम देणं आहे, असे म्हणावयास हरकत नाही. ॲड. रावसाहेब शिंदे मूल्य विचाराबाबत आपल्या मनोगतात म्हणतात, ''समाज शहाणा होण्यासाठी त्याची नैतिक पातळी विकसित करणे गरजेचे आहे. यासाठी माणसांची अंतर्बाह्य स्वच्छता आणि चारित्र्य उत्तम असले पाहिजे. महात्मा गांधीजींचे विचारच या विश्वाला तारू शकतील, त्या मार्गानेच विश्वमानवाचे कल्याण होईल. समाज हा मूल्याधिष्ठित झाला पाहिजे, मूल्ये जोपासणारा झाला पाहिजे, एकंदरीत सारे विश्वच हे मूल्यांची कदर करणारे झाले पाहिजे कारण मानवजात सुखी होण्याचा तो एक आधार आहे. 'प्रश्न आहे मूल्यांचा' हे पुस्तकच एक विचार आहे, जागर आहे. तो एक मूल्यांचा ध्यास आहे आणि विचार विश्वातले एक 'ध्यासपर्व'च आहे.'' (पृ. ८) रावसाहेबांचे संपूर्ण जीवनच एका ध्येयाने आणि ध्यासाने केलेल्या संघर्षाची कहाणी आहे. 'ध्यासपर्व' हा ग्रंथ त्यांचे प्रांजल आत्मकथन अणि प्रौढ जीवनचिंतन आहे. डॉ. आनंद यादव ध्यासपर्ववर पत्रात्मक प्रतिक्रिया देताता म्हणतात,"सामाजिक-राजकीय क्षेत्रात तुम्ही केलेल्या कामगिरीचा प्रत्यय पानोपानी येतो. 'ध्यासपर्व' म्हणजे स्वातंत्र्य चळवळीतील महाभारताचे जणू 'व्यासपर्व' वाटावे, इतक्या योग्यतेचे आहे. दिशाहीन झालेल्या तरुणपिढीने ते अभ्यासण्यासारखे आहे."[१] ॲड. रावसाहेब शिंदे मानवी जीवनाला अर्थपूर्ण करणाऱ्या उमलत्या फुलासारखे पाहतात. त्याचं मन मूल्याधिष्ठीत जीवनाची ओढ असलेलं मन आहे. प्रत्येक लेखातून कोणता ना कोणता मूल्यविचार ते वाचकांच्या समोर व्यक्त करतात. वाचकांनी आवर्जून या मूल्यविचारांचा अंगिकार करावा, अशीही अपेक्षा ॲड. रावसाहेब शिंदे आपल्या लेखनातून व्यक्त करतात.

### ३.ॲड. रावसाहेब शिंदे एक विचारशील व्यक्तिमत्त्व

ॲड. रावसाहेब शिंदे हे एक विचारशील व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या विचारधारेवर महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, माता-पिता, बंधू यांच्या विचारांचा प्रभाव आहे. समाजाप्रतीचा कल्याणकारी विचार ते चर्चेच्या ओघात सहजपणे इतरांच्यापर्यंत पोहचवतात. याशिवाय त्यांच्या 'शिक्षण आणि समाज' या ग्रंथात ॲड. रावसाहेब शिंदे यांनी शिक्षण आणि समाज या संबंधीचे विश्लेषणात्मक विचार मांडलेले आहे. शिक्षण क्षेत्रातल्या अनुभवसिध्द शैक्षणिक विचार ते अधिक प्रगल्भतेने व्यक्त करतात. या शैक्षणिक लेखाबदद्ल विचार व्यक्त करताना श्री. ए.जी. करांडे म्हणतात, "'शिक्षण आणि समाज' हा ग्रंथ वाचताना ॲड. शिंदे यांनी शिक्षण पध्दतीचा आणि एकूण समजाशास्त्राचा किती बारकाईने अभ्यास व चिंतन केले असेल याची जाणीव होते."[२] हीच रावसाहेबांची शैक्षणिक विचारधारा आहे. या ग्रंथाखेरीज 'प्रश्न आहे मूल्यांचा', 'भावलेल्या प्रस्तावना' आणि 'विचारवेध' ही ग्रंथसंपदा मूल्याधिष्ठित विचारांचे आणि कृतीचे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या 'शिक्षण आणि समाज' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा साहित्य अकादमीचा पुरस्कारही प्राप्त झालेला आहे.

### ३.१ पुरोगामी विचारधारा

आधी स्वातंत्र्यासाठी व नंतर समाजासाठी जीवन समर्पित करणारे ॲड. रावसाहेब शिंदे एक पुरोगामी विचाराचे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांची साहित्यसंपदाही याच विचारातून आकाराला आलेली आहे. त्यांनी 'शिक्षण आणि समाज', 'प्रश्न आहे मूल्यांचा' तसेच 'विचारवेध' हे शुध्द वैचारिक ग्रंथाचे नमूने आहेत. 'चरित्र आणि चारित्र्य', 'भावलेली माणसं' ही त्यांच्या आदर्श व्यक्तिमत्त्वाच्या जाणिवेने घेतलेल्या समाजसेवक, विचारशील दृष्टीची निर्मिती आहे. 'भावलेल्या प्रस्तावना' हा ग्रंथ त्यांच्या वाड्.मयीन विचारशीलतेची जाणीव करून देणारा आहे. 'संवादपर्व' हा तर त्याच्या पत्रात्मक वैचारिक वाड्.मयाचा अनोखा पैलू आहे. तर 'ध्यासपर्व' हे त्यांचे आत्मकथन आहे.

ॲड. रावसाहेब शिंदे यांचे सर्व लेखन हे विचारशीलतेतून निर्माण झाले ते ललित लेखक नसून वैचारिक लेखक आहेत, असे स्पष्टपणे जाणवते. आत्मकथनाचा एक अपवाद सोडला तर त्यांच्या हातून फक्त लेखनाच्या संदर्भात अनेक दिशांनी विचार करता येतो. अभ्यासाच्या सोईसाठी येथे 'प्रश्न आहे मूल्यांचा' या पुस्तकाचा विशेष निर्देश केला आहे.

### ३.२ ॲड. रावसाहेब शिंदे यांचे प्रगल्भविचार विश्व

लेखकाच्या अनुभवविश्वातून विचाराची प्रगल्भता साकारते. लेखक हा समाजाचा एक घटक असल्यामुळे आपल्या वास्तवदर्शी अनुभव आणि विचारांना साहित्याच्या माध्यमातून समाजाप्रती तो प्रकट करतो. ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या विचारविश्वामध्ये त्यांचे माता-पिता, बंधू, गुरूजन आणि पुढील काळात महात्मा गांधी, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचाराचा प्रभाव आहे. त्यामुळे बालपणापासून रावसाहेबांचे विचारविश्व हे प्रगल्भ आहे. कुठल्याही राष्ट्राचे प्राण हे स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्याशिवाय राष्ट्राला जसा अर्थ नाही तसा व्यक्तीलाही नाही. व्यक्तीच्या स्वातंत्र्याची जोपासना ही संविधानाने व्यक्तीला प्रदान केलेली असते. भारत देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी देशभक्तांनी संघर्ष केला. देशातील इंग्रज आणि काही समाजकंटक देशवासीय यांच्या विचाराने समाजसुधारक आणि क्रांतिकारक भारावून जाऊन कृतिशील होते. ॲड. रावसाहेब शिंदे देखील याच विचारांनी भारावून गेलेले होते. स्वातंत्र्य संग्रामातला त्यांचा सहवास हा एक झंझावातच होता. न्याय, समता, स्वातंत्र्य, लढे, चळवळी हा त्यांच्या विचार आणि कृतीचा अविभाज्य भाग होता. याच विचारातून रावसाहेब शिंदे लढले आणि आजही ते लढत आहेत. त्यांच्या विचारांमध्ये समाजाप्रतीची कळकळ आणि तळमळ आहे. त्यांचे हे विचार त्यांच्या साहित्यातून उमटतात. म्हणून त्यांचे साहित्य हे समाजपरिवर्तनाचे साहित्य आहे. 'प्रश्न आहे मूल्यांचा' या पुस्तकातील रावसाहेबांचे विचार समाजसुधारणेचे विचार आहेत. संकुचित, स्वार्थी वृत्तीच्या पलिकडे जाऊन व्यापक हिताचा विचार करणे महत्त्वाचे असते अशा भावनेतून स्वामी विवेकानंद, महात्मा गांधीजींसारख्या विभूतींनी आपले आयुष्य वेचले आहे. हा वैचारिक वसा ॲड. रावसाहेब शिंदे यांनी जोपासलेला आहे. सत्य, अहिंसा, नीती, विवेक, दया, क्षमा, शांती आणि प्रज्ञा अशा गुणांचा विकास त्यांच्या साहित्य लेखनातून वाचावयास मिळतो. रावसाहेबांचे जीवन मूळातच समाजाप्रतीचे समर्पित जीवन आहे. म्हणूनच ते समाजसुधारणेसाठी आपल्या विचारांची उधळण करतात. प्राचार्य डॉ. एन.एम. कोकोडे रावसाहेबांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याबदद्ल लिहितात, "रावसाहेबांचा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनातील सहभाग अष्टपैलू कर्तृत्वाची साक्ष देतो, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला व कार्याला म. गांधीजींच्या विचारांची आणि नैतिक मूल्यांची एक वेगळीच झळाळी आहे. जीवन जगताना विविध क्षेत्रात जोपासलेला सेवाभाव हाच त्यांच्या कार्याचा गाभा आहे."[३] मुळातच शिंदे घराण्याची परंपरा ही सामाजिक न्यायाची आहे. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात ध्येयाच्या झंझावाताने कार्य करणारे रावसाहेब पूर्णवेळ समाज कार्यकर्तेच आहेत.

### ३.३ ॲड. रावसाहेब शिंदे यांची समाजजीवनाची स्पंदने

'प्रश्न आहे मूल्यांचा' या पुस्तकात ॲड. रावसाहेब शिंदे यांनी अनेक सामाजिक विचार मांडलेले आहेत. 'स्पंदन, समाजजीवनाची' या भागामध्ये रावसाहेबांनी ग्रामीण संस्कृतीचा विकास, सण-उत्सव, गणपतबाबांचे दातृत्व, शेतात हुंदडण्याचा आनंद, शिक्षणाला श्रमसंस्कृती, शीलसंवर्धन व चारित्र्याची जोड, भ्रष्टाचाराचे निर्मूलन, श्रमाचे संस्कृतीच्या विकासाचे नाते, आदिवासींच्या जगण्याची कथा आणि व्यथा, डॉ. शीतल आमटे यांची समर्पित भावनिष्ठ आरोग्यसेवा, कोर्टातील सामाजिक व्यवस्था, वकिली व्यवसायासंबंधीची नीतीमत्ता, वकिली व्यवसायासंबंधी अब्राहम लिंकन, महात्मा गांधी यांच्या विचाराचा प्रभाव, समाजाची मानसिकता बदलविण्याचा उपक्रम आणि समाजाची वैचारिक उन्नती वाढविण्याचे प्रयत्न आणि वकिली व्यवसायातील पारंपरिक, सुतकी विचारसरणी, सामाजिक स्थैर्य बिघडविण्यास कारणीभूत ठरणाऱ्या अपप्रवृत्ती, सतावणारा हिंसाचार, अत्याचार, आक्रमणे, भ्रष्टाचार, विविध प्रदूषणे, क्रिकेटचे व्यसन दुष्ट व राक्षस शक्ती, वाचनसंस्कृतीचा विकास अशा विविध विचारांचे सूत्र रावसाहेब शिंदे आपल्या सामाजिक कार्याच्या माध्यमातून मांडतांना दिसतात. तसेच 'आमचे शिक्षण, दिशा की दशा!' या भागातून शिक्षणाचा हक्क, सार्वत्रिक शिक्षण, आजच्या शिक्षणाची दिशा आणि दशा, बालमजूरीची समस्या, शासनाच्या निष्कामी घोषणा,

निवासी आश्रमशाळा आणि शिक्षणाबाबतची शासनाची उदासिनता, चार भिंतीतील शिक्षण, मुक्तशिक्षण, चारित्र्यशील नागरिक घडविण्याचे शिक्षण, शाळेबाहेरचे शिक्षण समाजात साकारते अशा विविध विचासूत्रांची मांडणी रावसाहेब शिंदे यांनी आपल्या या लेखातून केलेली आहे. 'धरतीमातेचे वस्त्रहरण!' या भागातून सेंद्रिय शेतीचा अवलंब करणारा कृष्ण, जंगलतोडीने निसर्गाचे होणारे वस्त्रहरण, महाबळेश्वरच्या परिसरातील पर्यावरणाचा ऱ्हास, धरतीमाता वाचली तर आपण वाचू, माणसाचा अविचार आणि चंगळवादी वृत्तीने निसर्गाचा विनाशपर्वाकडे होणारी वाटचाल, भाऊसाहेब थोरात यांची दंडकारण्य अभियान योजना, महात्मा गांधीजींची पर्यावरण वाचविण्याची त्रिसूत्री योजना, अशा विविध विचारसूत्रे रावसाहेब शिंदे यांनी मांडलेले आहेत. याशिवाय 'पिता-पूर्णब्रह्माचा' या भागामध्ये कापूस एकाधिकार योजनेत शेतकऱ्यांचे नुकसान, शेती व शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, अत्याचारी एसईझेड योजना, शेतकरी जगला तर आपण जगू, एकिकडे जिद्द, दुसरीकडे आत्महत्या, थॉमस माल्थसचे अन्नविषयक विचार, शेततळ्याची फायदेशीर शेती अशी विविध विचारसूत्रे रावसाहेब शिंदे या भागातून मांडतात. याशिवाय 'कथा आणि व्यथा, स्त्रीजन्माच्या!' याभागातून स्त्रीजन्माची कहाणी, स्त्री भ्रूणहत्या, स्त्रीयांच्या मुक्ती चळवळी, स्त्रियांचे एकीचे बळ ही विचारधारा व्यक्त केली आहे. स्त्रियांचे समाजातील स्थान, स्त्रियांची परवड आदी स्त्री शक्तीचे दर्शन रावसाहेबांनी या पुस्तकांतून घडविलेले आहे. 'ध्यासपर्व' या आत्मचरित्राविषयी श्री. शिवाजी काळे लिहितात, "ध्यासपर्वमध्ये मुख्य १६ व गौण ८२ अशा एकूण ९८ स्त्री व्यक्तिरेखा आहेत. यावरुन रावसाहेबांनी आपल्या जीवनात स्त्रियांना सन्मानाची वागणूक आणि समानतेचे स्थान दिलेले आहे."[४] तसेच 'स्वातंत्र्य चळवळीचे वेचे' या भागातून स्वातंत्र्य संग्रामाचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव तर 'प्रेरणा आणि कर्तृत्व!' या भागातून ना. शरदराव पवार यांचा व्यासंग, शोधकता, कार्ये, डॉ. शिरोळे यांची आरोग्यसेवा, भाऊसाहेब थोरातांचे सहकारातील नैतिक कार्ये तसेच 'तेजोकण, विदेशातले' या भागातून अमेरिकेचा विकास व स्थैर्यता, हॉलंड या देशाचे पराक्रमी कार्य, राष्ट्रनिष्ठा आणि प्रयोगशीलता या विचाराचे सूत्र रावसाहेब शिंदे यांनी आपल्या लेखनातून मांडलेले आहे.

## ३.४ ॲड. रावसाहेब शिंदे यांची विचारशीलता व वैचारिक अधिष्ठान

ॲड. रावसाहेब शिंदे यांचे जीवन हे विचारसंस्कृतीचे पर्व आहे. 'प्रश्न आहे मूल्यांचा' हे पुस्तक म्हणजे एक 'ध्यासपर्व'च आहे. या पुस्तकामध्ये रावसाहेबांचे विचारधन आहे, मूल्ये आहेत. या पुस्तकातील प्रत्येक लेखातून समाज शहाणा होण्याचे आणि समाजसुधारणेचे विचार रावसाहेब मांडतात. लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर आदी लेखकांनी वैचारिक लेखनातून सामाजिक विचार मांडलेले आहे. त्याप्रमाणे रावसाहेब आपल्या या पुस्तकातून सामाजिक विचार मांडतात. वैयक्तिक जीवनावर आधारीत यामध्ये कोणताही भाग नसून केवळ समाजाप्रतीचे विचारांची देवाणघेवाण आणि मंथन आहे. समाज जीवनाच्या विविध स्पंदनांमध्ये त्यांचे विचार कधी इंद्रधनुष्यासारखे विविध रंगी होतात तर कधी अंध:कारमय होऊन जातात. शिक्षणक्षेत्रातील दिशाहिनतेचे वास्तव त्यांच्या अंत:करणाला टोचणी देते. शेती आणि शेतकरी यांचा गौरवशाली इतिहास, पाण्यासाठीची युध्दे, स्त्रियांची परवड आणि शास्त्राच्या प्रगतीचा अमानुष वापर, व्यक्तीची दृष्टी आणि प्रेरक कर्तृत्व, विदेशातील प्रगतीची आणि पराक्रमाची घोडदौड आदी विचारांची दृष्टी रावसाहेब शिंदे यांनी या पुस्तकातून दिलेली आहे. याशिवाय अनिष्ट प्रवृत्तींनी घातलेल्या धुमाकूळाने समाजाची नैतिकता, संवेदनशीलता लोप पावत चाललेली असून समाज जीवनाचा स्थायीभाव निर्माण करण्यासाठी अजूनही काही प्रकाशाची बेटे आहेत, तीच ओॲसिस ठरणारी आहेत, असे रावसाहेबांना मनोमन वाटते. रावसाहेब म्हणतात, ''समाजाची नैतिक पातळी विकसित करणे आणि चारित्र्यशील समाज घडविण्यासाठी म. गांधीजींची साधन-शुचिता आणि विचारशक्ती महत्त्वाची असून समाजाने मूल्यांची कास धरल्याशिवाय समाजाचे नैतिक अधिष्ठान होणार नाही.'' (पृ.८) रावसाहेबांचे हे विचारमूल्य म्हणजे त्यांचे चिंतन आणि चेतना आहे. रावसाहेबांचा माणुसकीचा गोतावळा त्यांच्या पत्रव्यवहारात प्रकट झालेला आहे. वाङ्‍मयीन गुणवत्ता लाभलेला त्यांचा पत्रव्यवहार विचारमूल्यांची कास धरणारा आहे. प्रा. डॉ. एकनाथ ढोणे रावसाहेबांच्या पत्रव्यवहारात प्रस्तावनेत लिहितात,"रावसाहेबांनी अनेकांना लिहिलेल्या पत्रांत मूल्यांच्या निकषावर माणसांच्या सद्‌गुणांचे दर्शन घडविलेले आहे."[५] या चैतन्याच्या प्रकाशाने सर्व समाज उजळून निघावा, अशी अपेक्षा ते या मूल्यरूपी विचारधारेतून व्यक्त करतात.

रावसाहेबांच्या या पुस्तकामध्ये विचारांची उधळण आहे. महात्मा गांधी, महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या विचारविश्वातून ज्या विचारांची कृती घडविली, त्याच विचारांच्या वाटेवरचे रावसाहेब शिंदे हे पांथस्थ आहे. आपल्या सोबतच्या समाजालाही ते आपल्या वैचारिक प्रवाहामध्ये सामील करून घेणारे ते समाजाचे 'अध्वर्यू' आहेत.

**४. मानवी विचारशील संस्कृतीची वाटचाल**

मराठी वैचारिक लेखन विविध विषयांनी नटलेले आहे. हयामध्ये नीती आणि सदाचाराविषयी विपूल लेखन झालेले आहे. मानवी जीवनाविषयी असलेल्या अपार करूणेतून हे लेखन अभिव्यक्त झालेले आहे. धर्माच्या नावावर होणारे शोषण, अनाचार ह्या विषयी परखड टीका जरी असली तरी त्यामध्ये तसे अध्यात्माच्या आधारे सदाचाराची शिकवणही दिली गेली आहे. या वैचारिक लेखनामध्ये मानव आणि मानवता हे विचारवंतांच्या चिंतनाचा विषय बनलेले आहे. मानवी जीवन आणि मानवी संस्कृती सुखकर आणि सुंदर करण्याचाच वैचारिक साहित्याचा विचार आहे. मानवी संस्कृतीनेच समाजाची धारणा होते. वैचारिक साहित्यामध्ये माणूस हा जीवनाचा आणि संस्कृतीचा केंद्रबिंदू आहे. माणसाची संस्कृती विचारातून आकाराला आलेली आहे. विचार हे माणसाचे प्रमुख हत्यार ठरल्यामुळेच इतर प्राण्यांपेक्षा त्याची प्रगती झालेली आहे. माणसाने आपल्या बुध्दीच्या जोरावर अनेक दिशांनी प्रगती केलेली आहे. आध्यात्मिक विचारधारेनंतर त्यांची आधुनिक विचारधारा स्वातंत्र्यमूल्याला महत्त्व देणारी आहे.

**५. मानवी विकासाची कार्यशाळा**

**''विश्वी विश्वंभर। बोले वेदांताचे सार।।**

**जगी जगदीश। शास्त्रे वदती सावकाश।।**

**व्यापिले हे नारायणे। ऐसी गर्जती पुराणे।।**

**जनी जनार्दन। संत बोलती वचन।।**

**सूर्याचिया परी। तुका लोकी क्रीडा करी।।''**

कुरूक्षेत्रावर भावनाविवश झालेल्या अर्जुनाला कर्तव्याची जाणीव देण्यासाठी श्रीकृष्णाला गीता सांगावी लागली. संत ज्ञानेश्वरांना या गीतेचे तत्त्वज्ञान साध्या सोप्या मराठी भाषेतून लोकांना सांगावे लागले. ह्या विचारामागे

**''शहाणे करूनी सोडावे सकळजन''**

ही भावना होती. संत तुकडोजी महाराजांना 'ग्रामगीता' सांगावी लागली. संत गाडगे महाराजांनी रस्त्यावरच्या विद्यापीठातून लोकशिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या सर्व प्रयोगशाळेत 'विचारदिशा' महत्वाची होती. भारतीय समाजाची चार आश्रमव्यवस्था, चार वर्णव्यवस्था, चार वेदांची शिकवण इत्यादींमधून समाजाची जडणघडण झाली. काळाच्या ओघात आदर्श मूल्यांना काळीमा फासण्याचे काम केले गेले. स्वार्थासाठी 'माणुसकीचे तत्त्वज्ञान' मागे पडले म्हणून संतमाहात्म्ये, समाजसेवक, विचारवंतांनी कृती व विचारांच्या प्रयोगशाळेतून समाज घडविण्याचे प्रयत्न केले. मूल्याधिष्ठित समाजासाठी वैचारिक वाड्.मय ही मानवी संस्कृतीची खरी गुरूकिल्ली आहे.

**६.समारोप**

ॲड. रावसाहेब शिंदे हे स्वातंत्र्यसैनिक व तळमळीचे समाजसेवक आहे. त्यांची साहित्यनिर्मिती ही त्यांच्या समाजचिंतनाची एक कार्यशाळाच आहे. त्यांच्या विचारावर महात्मा गांधी, सानेगुरुजी आणि कितीतरी स्वातंत्र्यवीरांचा व राष्ट्रभक्तांचा प्रभाव आहे. त्यतून त्यांची स्वतंत्र वैचारिकदृष्टी तयार झालेली आहे.

वैचारिक वाड्.मयाला समाजप्रबोधनाचे व समाजसेवेचे सूत्र आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात रावसाहेबांनी वैचारिक वाड्.मय अभ्यासलेले आहे. त्यामुळे रावसाहेबांच्या विचारावरही या निर्मितीचा प्रभाव आहे. तसेच विचारांच्या प्रवाहाचाही त्यांनी अभ्यास केलेला असल्यामुळे रावसाहेबांच्या विचारांना अनुभवसिध्दतेची आणि नैतिकतेची धार आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये प्रकटनाचे सामर्थ्य आहे. वेळप्रसंगी चुकीच्या

गोष्टींवर आपले परखड मत व्यक्त करण्याचे धाडस त्यांच्या वैचारिक साहित्याने केलेले आहे. तेव्हापासून वैचारिक साहित्यातून सामाजिक, राजकीय, धार्मिक गोष्टींमध्ये वैचारिक बदल घडवून लोकांपर्यंत हे साहित्य पोहच करण्यावर त्यांनी भर दिलेला आहे. बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, लोकहितवादी, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कृष्णराव भालेकर आदी लेखकांनी वैचारिक वाड्.मयामध्ये लेखन समाज जागृतीचे कार्य केलेले आहे. या कार्याचा त्यांच्या मनावर प्रभाव आहे. त्यांनी आपल्या विचारमूल्यातून वैचारिक वाड्.मयाची निर्मिती केलेली आहे. त्यांच्या या वैचारिक लेखनात समाजाबद्दलची तळमळ आणि कळकळ आहे. 'प्रश्न आहे मूल्यांचा' हे पुस्तक मुळातच विचार आणि मूल्यांचे संस्करण असल्यामुळे वैचारिक वाड्.मय लेखनामधील आधुनिक काळातील तो एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. त्यामुळे हे पुस्तक त्यांच्या अनुभूतीतले एक 'वाड्.मयीन विचारशिल्प'च आहे. त्यांच्या वैचारिकतेला नैतिकता, चारित्र्यशीलता, व्यासंग, गाढा अनुभव, संवेदनशीलता, राष्ट्रभक्ती यांचे अधिष्ठान असल्यामुळे त्यांचे विचार हे समाजाला तारून नेणारे विचार आहे, हे या पुस्तकातील विचारविश्वातून व्यक्त होते. त्यांचाच येथे घेतलेला शोध आणि बोध समाज कल्याणकारी आहे, हे निश्चितपणे मनावर ठसणारे आहे. हीच या पुस्तकाची खरी गुणवत्ता आहे.

## १३.संदर्भ टीपा


१.यादव आनंद, 'प्रतिध्यास',संपादक डॉ. शंकराराव गागरे, सुयोग ऑफसेट, श्रीरामपूर, २६ नोव्हेंबर २००६, पृ. क्र. २५

२. करांडे ए. जी., 'ग्रंथप्रेमी रावसाहेब','रावसाहेब शिंदे प्रेरणापर्व',संपादक प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये, प्रकाशक उल्हास लाटकर, अमेय प्रकाशन, पुणे, २६ एप्रिल २००८, पृ. क्र. १९६

३. कोकोडे एन.एम., 'बहुआयामी व्यक्तिमत्त्व', 'प्रेरणापर्व', (संपादक) प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये, प्रकाशक उल्हास लाटकर, अमेय प्रकाशन, पुणे, २६ एप्रिल २००८, पृ. क्र. १००

४. काळे शिवाजी, ॲड. रावसाहेब शिंदे यांचे 'ध्यासपर्व' (आत्मचरित्र) आकलन आणि मूल्यमापन, मार्च २०१०, पृ.क.६७

५. ढोणे एकनाथ, 'प्रस्तावना','पत्रसंवाद', प्रा. डॉ. एकनाथ ढोणे, प्रकाशक उल्हास लाटकर, अमेय प्रकाशन, पुणे, २६ एप्रिल २००८, पृ. क्र. ७